मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्वार्थाची शिदोरी : आमदारकी एकीकडून, महापालिका कोणत्या पक्षातून?

## राजकारण म्हणजे तत्त्वनिष्ठतेची शपथ आहे की स्वार्थ साधण्याचे मंच?

**पिंपरी | प्रतिनिधी**

राजकारण म्हणजे तत्त्वनिष्ठतेची शपथ आहे की स्वार्थ साधण्याचे मंच? हा प्रश्न पिंपरी, चिंचवड आणि भोसरीच्या राजकीय समीकरणांनी पुन्हा एकदा पुढे आणला आहे. जेव्हा विधानसभा निवडणुक आली, तेव्हा उमेदवारीच्या हव्यासापायी काहींनी कट्टर निष्ठेची शपथ घेऊनही स्वतंत्र मार्ग निवडला, पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाला छेद दिला. पण आज पुन्हा महापालिका निवडणुकीच्या उंबरठ्यावर तेच नेते ज्या पक्षातून त्यांनी आमदारकी लढवली, त्याच पक्षाच्या दारात परत तिकीटासाठी रांगेत उभे राहतील का हा खरा प्रश्न जनतेपुढे उभा आहे.

आमदारकीसाठी पक्षाचे नाव वापरायचे आणि जेथे स्वतःला सोयीस्कर वाटेल तेथे बंडखोर म्हणून उभे राहायचे — हे दोन पायांवर दोन रस्त्यांनी चालण्यासारखे आहे. निवडणुकीच्या परिणामांनी अशी राजकीय कसरत कितपत टिकाऊ आहे हे दाखवून दिले. नेते कितीही प्रभावी असले तरी, जनतेच्या मनात शंकेची पाल कायमच चुकचुकत राहते – "हे नेतृत्व खरंच आपल्या विकासासाठी काम करणार की केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षांतर करणार?"

महापालिका ही थेट लोकजीवनाशी निगडित सत्ता आहे. रस्ते, पाणी, वीज, शाळा – या सेवा मतदारांना हव्याहव्याशा वाटतात. आणि त्यासाठी लागतो स्थैर्यवान, निष्ठावंत आणि जबाबदार कारभार. स्वार्थासाठी पक्ष बदलण्याची सवय ज्या नेत्यांनी जोपासली आहे, त्यांच्यावर अशी जबाबदारी टाकताना जनता दहा वेळा विचार करेल हेही तितकेच खरे.




आगामी निवडणुकांचा नेमका गाभा इथेच आहे – तात्पुरत्या सोयीसाठी राजकारण करायचे की दीर्घकालीन निष्ठेने पक्ष आणि जनतेची साथ टिकवायची? उत्तर निवडणुकीनंतर स्पष्ट होईल. पण एक मात्र निश्चित – लोक आता आपल्या डोळ्यांसमोर स्वार्थी राजकारणाचा खेळ फार काळ सहन करणार नाहीत.

# 32 प्रभागांतून निवडले जाणार 128 नगरसेवक

## गवळीनगर, चक्रपाणी वसाहत ठरला सर्वात कमी लोकसंख्येचा मतदार संघ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना अखेर (२२ ऑगस्ट) जाहीर करण्यात आली. या प्रारूप रचनेनुसार प्रभाग क्रमांक ९ (मासुळकर कॉलनी, खराळवाडी परिसर) हा सर्वाधिक लोकसंख्येचा असून याठिकाणी ५९,३९० लोकसंख्या आहे. दुसरीकडे प्रभाग क्रमांक ५ (गवळीनगर, चक्रपाणी वसाहत) हा सर्वात कमी लोकसंख्येचा प्रभाग असून येथे ४९,०४९ लोकसंख्या नोंदवली गेली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना अखेर शुक्रवारी (२२ ऑगस्ट) जाहीर करण्यात आली. नव्या रचनेनुसार शहरात एकूण ३२ प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून चार नगरसेवक निवडले जाणार आहेत. यानुसार एकूण १२८ नगरसेवक महापालिकेत निवडून येणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, या प्रारूप रचनेवर ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत नागरिक व इच्छुक उमेदवारांकडून हरकती व सूचना मागवण्यात येणार आहेत. यानंतर ५ ते १२ सप्टेंबर दरम्यान सुनावणी होणार आहे. त्यानंतर सुधारित रचना १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान नगरविकास विभागाकडे सादर केली जाईल. अंतिम मंजुरीनंतर महापालिका आयुक्तांकडून अंतिम प्रभाग रचना घोषित केली जाईल.




### आरक्षणानुसार जागा

- » महिला व पुरुष प्रत्येकी- ६४ जागा
- » अनुसूचित जाती (SC) – २० जागा
- » अनुसूचित जमाती (ST) –३ जागा
- » इतर मागासवर्गीय (OBC) – ३५ जागा
- » खुला प्रवर्ग – ७० जागा

राखीव असणार आहेत.

### तळवडे-चिखली भागातून प्रभाग रचना सुरू

» महापालिकेच्या २०१७ मधील निवडणुकीप्रमाणेच यंदाही चार सदस्यीय प्रभाग पद्धत कायम ठेवण्यात आली आहे. २०११ च्या जनगणनेतील १७,२७,६९२ लोकसंख्या या आधारे प्रभाग रचना करण्यात आली आहे. यावेळी तळवडे-चिखली भागातून प्रभाग रचना सुरू करण्यात आली असून सांगवी-दापोडी भागापर्यंत उतरत्या क्रमाने प्रभाग आखण्यात आले आहेत. गुगल अर्थ मॅपचा वापर करून आणि स्थळ पाहणी करूनच अंतिम नकाशे तयार करण्यात आले.

> “ या रचनेची नकाशे महापालिका मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालये व महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# फ्लेक्सबाजी करणाऱ्याला मतदान करू नका

## अनधिकृत फ्लेक्समुळे अपघात आणि शहराचे विद्रुपीकरण; उपमुख्यमंत्री अजित पवार



**पिंपरी | प्रतिनिधी**

जो काम करतो त्याला जाहिरात बाजी करावी लागत नाही. त्याचे कामच त्याची ओळख असते. मात्र सध्या जाहिरात बाजी करायची. मोठमोठे फोटो लावायचे. शहरभर फ्लेक्स टांगायचे असे उद्योग सुरू आहेत यातून अपघात आणि शहराचे विद्रूपीकरणच होते. म्हणून असे अनधिकृत फ्लेक्स लावणारे जाहिरात बाजी करणाऱ्यांना घरी बसवा त्यांना मतदान करू नका असा सल्ला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड येथे दिला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयोजित स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ च्या यशस्वी कामगिरीमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक, लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था, महापालिका अधिकारी-कर्मचारी आदींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. या सहभागाबद्दल प्रतिनिधिक स्वरूपात त्यांचा सन्मान देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. यावेळी अजित पवार बोलत होते.

भारत सरकारच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत घेतलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड शहर देशात सातवे तर राज्यात प्रथम क्रमांकाचे शहर ठरले आहे. याशिवाय शहराला ७ स्टार कचरामुक्त शहर व वॉटर-प्लस प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. याबद्दल पिंपरी चिंचवड महापालिकेला केंद्र शासनाने पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. या यशामध्ये सहभाग घेऊन योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या पुर्वतयारीचा प्रारंभ आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे उपस्थित होते.

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, बारामती नगरपरिषद हद्दीत अनधिकृत बॅनर, फ्लेक्स, जाहिरातींवर बंदी घालण्यात आली असून, उल्लंघन करणाऱ्यांवर न्यायालयीन गुन्हा दाखल केला जाणार आहे. याचाच धागा पकडत अजित पवार यांनी नागरिकांना निवडणुकीच्या तोंडावर खास सल्ला दिला आहे. ज्याची जास्त फ्लेक्स बाजी त्याला मतदान करु नका, असे सांगत ते म्हणाले. माझा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस एकाच वेळी असल्याने काही जण माझा आणि देवेंद्र फडणवीस यांचे फ्लेक्स लावत शुभेच्छा देतात. एका बाजूला देवा भाऊ तर दुसऱ्या बाजूला अजित दादा आणि त्यावर आमचे फोटो छोटे आणि जो शुभेच्छा देतो त्याचा फोटो मोठा. " वाढदिवस कुणाचा आमचा की तुझा. कदाचित काम करत नसतील म्हणून जास्त फ्लेक्स लावतात, जो काम करतो त्याला फ्लेक्स लावायची गरज नाही.म्हणून आता ज्याने जास्त फ्लेक्स बाजी केली त्याला मतदान करू नका. या अनधिकृत जाहिरातबाजीमुळे पादचा-यांना त्रास होतो, केलेल्या वृक्ष लागवडीचे नुकसान होते, शहर विद्रुप होते, रस्त्यावरुन जाणा-या वाहनचालकांचे लक्ष विचलित होऊन अपघातही होऊ शकतो. असेही पवार म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आर.आर.आर. सेंटर डॅशबोर्ड प्रणाली, शून्य कचरा प्रकल्प डॅशबोर्ड प्रणाली, स्वच्छ शौचालय ॲप, स्वच्छता सर्वेक्षण २०२५-२६ मॅस्कॉट व घोषवाक्याचे तसेच हरित सेतू प्रकल्प बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. या प्रकल्पांबाबत माहिती देणारी तसेच महापालिकेच्या वतीने पर्यावरण विषयक राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती देणारी चित्रफित यावेळी दाखवण्यात आली.

### स्वच्छ सर्वेक्षण 2024-25 मध्ये योगदान देणाऱ्यांचा सन्मान

**» सफाई सेविका अनुसया वाकचौरे, वैशाली मारणे, सफाई सेवक शिवानंद मोची, लक्ष्मण पांचाळ, गंगा वाघमारे, मंगेश रघुराव, दीपक शिंदे, सीताराम दाते, कचरा संकलन वाहक चालक राजू देवकर, निलेश कांबळे, आयईसी सदस्य अनिकेत पवार, शुभांगी राठोड, योगीता ढाकरे, सुखदेव लोखंडे, अनिलकुमार पाटील, सुरेखा इंगळे, रोहन वडमारे, कुशल मोरे, स्वच्छता दूत पूजा शेलार, सुरेखा डोळस, संगीता जोशी, अदिती निकम, यशवंत कन्हेरे, आर.जे. बंड्या, ईशिता बारवाड, नवी दिशा महिला बहुउद्देशीय मंडळ, वैष्णवी बचत गट, महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, अश्विनी गायकवाड, अजिंक्य येळे, अमित पंडित, तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे, पूजा दुधनाळे, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, अंकुश झिटे, सुधीर वाघमारे, किशोर दरवडे, शांताराम माने, महेश आढाव, राजेश भाट, श्रीराम गायकवाड आदींचा सन्मान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला.**

# तालेरा रुग्णालयात अत्याधुनिक डायलिसिस सेंटर

## दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध : अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा उद्देश सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. तालेरा रुग्णालयात सुरू झालेले हे डायलिसिस सेंटर म्हणजे त्याच दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या सुविधेमुळे मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळेल आणि त्यांना जवळच मिळणा-या या सुविधेमुळे त्यांची धावपळ कमी होण्यास मदत होईल असे प्रतिपादन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या तालेरा रुग्णालयात महापालिकेच्या वतीने नवीन डायलिसिस केंद्र उभारण्यात आलेले आहे या केंद्रासाठी फियाट इंडिया ऑटोमोबाईल्स प्रायव्हेट लिमिटेड (FIAPL) कंपनीच्या सहकार्याने सीएसआर फंडातून ८ डायलिसिस मशिन अत्याधुनिक बेडसह देण्यात आले आहेत, या डायलिसिस सेंटरचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त खोराटे यांच्या हस्ते संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेंद्र फिरके,डॉ.संगिता तिरूमणी,डॉ.संजय सोनेकर,डॉ.लक्ष्मीकांत अत्रे, डॉ.अलवी नासिर,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सीएसआर मुख्य सल्लागार विजय वावरे, फियाट कंपनीच्या मानव संसाधन विभागाच्या सहाय्यक उपाध्यक्ष संचिता कुमार, सीएसआर उप व्यवस्थापक शुभम बडगुजर आणि अमोल फटाळे यांच्यासह महापालिकेच्या सीएसआर सल्लागार श्रुतिका मुंगी तसेच रुग्णालयातील कर्मचारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त खोराटे म्हणाले,आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तालेरा आणि जिजामाता रुग्णालयात सुरू झालेल्या या डायलिसिस सेंटरमध्ये उच्च दर्जाची यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक डायलिसिस मशीन, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी, रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र बेडची सोय, आपत्कालीन उपचाराची तत्पर सुविधा आणि रुग्णांसाठी स्वच्छ, सुसज्ज वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. महापालिकेच्या या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, आरोग्यसेवा अधिक परिणामकारकरीत्या नागरिकांपर्यंत पोहोचेल.

दरम्यान, फियाट कंपनीने मागील वर्षी सीएसआर फंडातून २८० दिव्यांग मुलांना कृत्रिम अवयव, व्हीलचेअर्स, श्रवणयंत्रे आदी साहित्याचे वितरण केले होते. तर यावर्षी तालेरा रुग्णालय येथे ८ खाटांचे तर जिजामाता रुग्णालय येथे ४ खाटांचे डायलिसिस मशिन,अत्याधुनिक बेडसह फियाट कंपनीच्या सीएसआर फंडातून देण्यात आले आहेत तसेच या डायलिसीस सेंटर साठी एमक्युअर कंपनीच्या सीएसआर फंडातून आर.ओ. प्लॅन्ट देखील बसविण्यात आला आहे.

**डायलिसिस सेंटरमध्ये रुग्णांसाठी मिळणाऱ्या सुविधा:**

अत्याधुनिक डायलिसिस मशीनची सुविधा

प्रशिक्षित डॉक्टर व तज्ज्ञ तंत्रज्ञांची उपलब्धता

प्रत्येक रुग्णासाठी स्वतंत्र व स्वच्छ बेडची सोय

आपत्कालीन उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा

निर्जंतुकीकरण आणि स्वच्छतेची काटेकोर काळजी

रुग्णांच्या सोयीसाठी आरामदायी,हवेशीर व सुरक्षित वातावरण

वेळोवेळी आरोग्य तपासणी व मार्गदर्शनाची सोय

लिफ्टची सोय

# पुण्यात 41 प्रभाग, 165 नगरसेवक

## पुणे महापालिकेची नव्या प्रारूप प्रभाग रचनेची घोषणा; हरकतींसाठी 4 सप्टेंबरपर्यंत मुदत




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या निवडणुकांसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाली असून, २०१७ च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा प्रभागाची संख्या एकने कमी होऊन ४१ झाली आहे. सदस्यांची संख्या एकने वाढून १६४ वरून १६५ वर पोहोचली आहे. चार सदस्यांचे ४० आणि पाच सदस्यांचा एक प्रभाग असणार आहे. हरकती आणि सूचनांसाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

तीन वर्षे रखडलेल्या निवडणूक प्रक्रियेला गती मिळाल्यानंतर आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते शुक्रवारी प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा प्रसिद्ध करण्यात आला. २०११ या वर्षाची लोकसंख्या गृहीत धरून प्रभागरचना करावी, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगाने दिल्या होत्या. त्यानुसार महापालिकेने ३४ लाख ८१ हजार ३५९ लोकसंख्येनुसार प्रभागरचना केली आहे. यामध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ४ लाख ६८ हजार, तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४० हजार आहे. या लोकसंख्येच्या आधारे १६५ नगरसेवकांची रचना असणार आहेत.

चार सदस्यांचे ४० आणि पाच सदस्यांचा एक असे ४१ प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत, असे महापालिका आयुक्त तथा प्रशासक नवल किशोर राम यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, एम. जे. चंद्रन, महापालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर, नगरसचिव योगिता भोसले आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या निवडणूक कार्यालयाने निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे पालन करून ही प्रभाग रचना तयार करून ती राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे पाठविली होती. त्याची तपासणी करत नगरविकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविली होती. निवडणूक आयोगाने त्याची तपासणी करून ही प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्धीसाठी महापालिकेकडे पाठविल्याचे आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले.

प्रभाग रचना करताना चार सदस्यीय ४० प्रभागांतील लोकसंख्या ही सरासरी ८४ हजार ३९६ इतकी गृहीत धरली गेली, तर पाच सदस्यीय प्रभागातील लोकसंख्या ही कमीत कमी ९४ हजार आणि जास्तीत जास्त एक लाख १६ इतकी गृहीत धरण्याचे बंधन निवडणूक आयोगाने घातले होते. त्यानुसार ही प्रभाग रचना केल्याचा दावा महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केला.

### हरकती नोंदविण्यासाठी ठिकाणे

» महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत नागरिकांना त्यांच्या हरकती आणि सूचना नोंदविता येणार आहेत. येत्या ४ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत नागरिकांना हरकती नोंदविता येणार आहे. महापालिका मुख्य भवन, १५ क्षेत्रीय कार्यालये तसेच सावरकर भवन येथील महापालिकेच्या निवडणूक कार्यालय अशा तीन ठिकाणी या हरकती नोंदविता येणार आहेत. ४ सप्टेंबरनंतर महापालिकेकडे आलेल्या हरकतींची छाननी करून त्यावर सुनावणी घेतली जाणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

### प्रभाग क्रमांक 38 सर्वांत मोठा, प्रभाग 39 लहान

» महापालिकेने जाहीर केलेल्या प्रभागांच्या रचनेत सर्वांत मोठा प्रभाग आंबेगाव-कात्रज (प्रभाग ३८) हा ठरला आहे. या प्रभागाची लोकसंख्या १ लाख १४ हजार ९७० इतकी आहे. तर सर्वांत लहान प्रभाग अपर सुपर इंदिरानगर हा (प्रभाग ३९) ठरला आहे. या प्रभागाची लोकसंख्या ७५ हजार ९४४ इतकी आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्ते खड्डेमुक्त करा

## अजित पवार यांच्या महापालिका, पीएमआरडीए आणि महामेट्रो या तिन्ही यंत्रणांना सूचना



**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत, राडारोडा उचलून रस्ते मोकळे करावेत, तसेच मेट्रोचे काम सुरू असलेल्या ठिकाणी जागा व्यापली असेल, तर काही भाग मोकळा करावा, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी दिल्या. महापालिका, पीएमआरडीए आणि महामेट्रो या तिन्ही यंत्रणांना सूचना दिल्या असल्याची माहिती पवार यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयात विविध शासकीय विभागांच्या बैठका पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडल्या. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. पवार म्हणाले, 'काही गणेश मंडळांनी सकाळी सात वाजता विसर्जन मिरवणुकीस सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे.

पुण्याच्या गणेशोत्सवाला मोठी परंपरा असून, दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक सहभागी होतात. त्यामुळे मानाच्या गणपतींचा मान राखून आणि सर्व मंडळांशी संवाद साधूनच समन्वयातून मार्ग काढण्यात येईल.'

वाहतूक कोंडीबाबत पवार म्हणाले, जशी जशी विकासकामे होत आहेत, त्यानुसार रस्ते व उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले होत आहेत. मात्र पावसामुळे व वाढत्या गर्दीमुळे कोंडी होते. लोकांचा त्रास कमी करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत फ्लेक्स व बॅनर तातडीने हटवावेत, असे आदेश पवार यांनी दिले.

जालना येथे एका नागरिकाला पोलिस अधिकाऱ्याने लाथ मारल्याच्या घटनेबाबत विचारले असता पवार म्हणाले, "पोलिसांनी लाथ मारायची नसते. कायदा कोणीही हातात घ्यायचा नसतो. पोलिसांची नियमावली ठरलेली आहे आणि त्यानुसारच कारवाई होईल. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी माणुसकी जपून काम करणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

### मेट्रो प्रवाशांसाठी सुविधा

» गणेशोत्सव काळात पुण्यात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मेट्रोसेवा रात्री दोन वाजेपर्यंत सुरू राहिल. तसेच कोणत्या स्टेशनवर उतरावे व कोणत्या स्टेशनवर चढावे, याबाबत स्पष्ट मार्गदर्शन करणारे फलक लावण्याच्या सूचना मेट्रो प्रशासनाला दिल्याचे पवार यांनी सांगितले.

# सीसीटीव्ही बसवा; मंडळांनी लाईट-लेझर शो टाळावा

## गणेशोत्सवासाठी पुणे ग्रामीण पोलिस सज्ज; 128 मंडळांसोबत आढावा बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सव निर्विघ्न पार पडावा, यासाठी प्रत्येक गणेश मंडळाने किमान चार सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, ध्वनिप्रदूषण वाढविणारे कर्णकर्कश ध्वनिक्षेपक व लाईट-लेझर शो टाळावेत, अशा स्पष्ट सूचना पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांनी दिल्या.



ग्रामीण पोलिस मुख्यालयात लोणावळा, खेड, जुन्नर आणि शिरूर उपविभागातील 18 पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील 128 गणेश मंडळाध्यक्ष, पोलिस पाटील यांच्या उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. या वेळी ते बोलत होते.

बैठकीला अप्पर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन टोम्पे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय, वीज वितरण कंपनी, परिवहन, उत्पादन शुल्क अशा विविध शासकीय विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शहरासह पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातही गेल्या काही दशकांत गणेशोत्सवाची परंपरा मजबूत झाली आहे. प्रत्येक गावात मंडळांनी सामाजिक उपक्रम, लोकजागृती, सांस्कृतिक कार्यक्रमांचा धागा जपला आहे. अनेक ठिकाणी मोठी गर्दी होते. त्यामुळे कायदा- सुव्यवस्था अबाधित राखून हा उत्सव निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी ग्रामीण पोलिसांकडून नियोजन केले जाते.

त्यानुसार अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांनी जिल्ह्यातील गणेश मंडळाच्या अध्यक्षांसोबत बैठक घेऊन सूचना केल्या आहेत. यामध्ये मंडळांनी सीसीटीव्ही बसविण्यासह स्वयंसेवक नेमून दोन सदस्यांनी रात्रीची देखरेख करणे, मंडळ व परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा टाळणे, निर्माल्य नदीत न टाकता पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जित करावे, महिलांशी संबंधित अनुचित घटना होणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना केल्या. मंडळाध्यक्षांच्या अडचणी जाणून घेत थेट पोलिसांशी संपर्क साधावा, असे आश्वासन दिले.

विसर्जन मिरवणुकीत वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही यासाठी नियोजन करणे आणि शासनाच्या आदेशांचे पालन न झाल्यास कायदेशीर कारवाई होईल, असा इशाराही बैठकीत देण्यात आला.

### वर्गणी- देणगीसाठी जबरदस्ती नको : पोलिस अधीक्षक

» गणेशोत्सव काळात कुठल्याही परिस्थितीत गणेश मंडळांनी वर्गणी किंवा देणगीसाठी नागरिकांवर जबरदस्ती करू नये, अशा स्पष्ट सूचना या वेळी पोलिसांनी दिल्या. स्वयंस्फूर्तीने मिळालेल्या देणग्या पारदर्शक पद्धतीने स्वीकाराव्यात. मात्र, जबरदस्तीने वर्गणी, देणगी घेऊ नये, असे सांगण्यात आले.

“ गणेशोत्सवासाठी पोलिस दल पूर्णतः सज्ज आहे. गणेशोत्सव हा श्रद्धेचा, एकोप्याचा आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव आहे. त्यामुळे मंडळांनी सीसीटीव्ही बसवून सुरक्षा वाढवावी, कर्णकर्कश ध्वनीक्षेपक व लेझर शो टाळावेत, अशा सूचना केल्या आहेत.

**- संदीपसिंग गिल्ल, पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण.**

# जिल्हा परिषदेची अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध

## ग्रामविकास विभाग आणि राज्य निवडणूक आयोग ठरविणार आरक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या 73 गट आणि 146 गणांची अंतिम प्रभागरचना जिल्हा प्रशासनाने शुक्रवारी प्रसिद्ध केली. ही रचना जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालयांच्या फलकांवर लावण्यात आली आहे.

गेल्या निवडणुकीच्या तुलनेत गट आणि गणांची संख्या कमी झाल्यामुळे आता आरक्षणदेखील नव्याने निश्चित करावे लागेल. यावर अंतिम निर्णय ग्रामविकास विभाग आणि राज्य निवडणूक आयोग घेतील. याबाबत कोणतीही कालमर्यादा निश्चित नसल्याने आरक्षण जाहीर झाल्यावर पुढील कार्यवाही केली जाईल, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**हरकतींवर सुनावणी आणि अंतिम मान्यता**

जिल्हा परिषदेच्या 73 गट आणि पंचायत समितीच्या 146 गणांच्या रचनेचा प्रारूप आराखडा 14 जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यावर 21 जुलैपर्यंत हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या होत्या.

या मुदतीत एकूण 217 हरकती दाखल झाल्या. या हरकतींवर संबंधित तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांकडून अभिप्राय मागविण्यात आले. त्यानंतर विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी सुनावणी घेऊन 115 हरकती आणि सूचना मान्य केल्या. विभागीय आयुक्तांनी सुचविलेले बदल करून सुधारित आराखडा पुन्हा त्यांच्याकडे पाठविण्यात आला. आयुक्तांनी हे बदल तपासल्यानंतर प्रभागरचनेला अंतिम मान्यता दिली, त्यानुसार ही रचना प्रसिद्ध झाली आहे.




### मागील आणि आताच्या रचनेतील फरक

» मागील निवडणुकीत जिल्हा परिषदेत 75 गट आणि 150 गण होते. यंदा मात्र दोन गट आणि चार गण कमी झाले आहेत. त्यामुळे आरक्षणातही बदल होणार आहेत. प्रत्येक गट आणि गणाची लोकसंख्या विचारात घेऊन आरक्षण निश्चित केले जाईल. अंतिम आरक्षण जाहीर झाल्यावर सोडत पद्धतीने ते लागू करण्यात येईल. मात्र, यासाठी कोणतीही निश्चित वेळमर्यादा नसल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. ही प्रभागरचना संकेतस्थळावरही उपलब्ध आह